GR 2004|004|22005002-|207

पूर्ण झालेल्या पाझरतलाव, गावतलाव, नाला [illegible]
सिमेंट प्लग, कच्चे बंधारे मधून उपसून पाणी [illegible]
[illegible]

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
परिपत्रक क्र. जल/[illegible]/१९९९/प्र.क्र. [illegible]
दिनांक 28 मार्च १९९९.

वाचावे :- १) शासन निर्णय, क्रमांक जलसं १०९२/[illegible]/जल-७ दिनांक [illegible]

२) शासन परिपत्रक क्र. [illegible]/[illegible]/९९-[illegible] दिनांक [illegible]

परिपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ अन्वये जलसंधारण कार्यक्रमांतर्गत जलसंधारण व पुनर्भरणासाठी नालाबंडींग, सिमेंट प्लग, कच्चे बंधारे, गावतळी, पाझर तलाव इत्यादी प्रकारची कामे हाती घेण्यात येतात. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरणात वाढ होऊन अनियोजित व अमर्याद पाण्याच्या वापरामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर जाणे व पिण्याच्या पाण्याच्या चिंताजनक परिस्थितीत सुधारणा व्हावी असा आहे. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की अशा पुनर्भरणाच्या कामामुळे निर्माण झालेल्या पाण्याच्या तलावामधून उपसाद्वारे सिंचनासाठी पाण्याचा वापर करण्यात येत आहे. तथापि ही बाब शासनाच्या विचार प्रणालीत बसत नाही तसेच अयोग्य आहे तरी असा वापर तात्काळ थांबविणे आवश्यक आहे.

या संदर्भात पाझर तलावामधून उपसा सिंचनासाठी पाणी वापरून होणारा दुरुपयोग थांबविण्यासाठी संदर्भाधीन दोन मध्ये नमूद केलेल्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तरी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जलसंधारण कार्यक्रमांतर्गत रोजगार हमी योजना अंतर्गत पुनर्भरणासाठी पूर्ण केलेल्या नालाबंडिंग/सिमेंट प्लग, कच्चे बंधारे, पाझरतलाव गावतळी कामाद्वारे निर्माण झालेला पाण्याचा साठा उपसून सिंचनासाठी कोणत्याही परवानगी देण्यात येऊ नये तसेच असा वापर आढळून आल्यास जिल्हा परिषदांनी तो थांबविण्याचे दृष्टीने तात्काळ नियमाप्रमाणे कार्यवाही करावी व पाण्याचा होणाऱ्या दुरुपयोगावर नियंत्रण ठेवण्याची दक्षता घ्यावी. यापुढे अशा बाबी शासनाच्या निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिक रित्या जबाबदार धरुन कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(गोरख मेध)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.